# २. संतवाणी

## (अ) अंकिला मी दास तुझा

**संत नामदेव** (१२७०-१३५०) :

वारकरी संप्रदायातील थोर संतकवी. संत नामदेवांची अभंगरचना अतिशय उत्कट असून त्यांच्या अभंगाची भाषा सुबोध, सरळ, साधी आहे. त्यांनी हिंदीतही रचना केली आहे. पंजाबात जाऊन त्यांनी भागवत धर्माची पताका फडकवली. शिखांच्या 'गुरु ग्रंथसाहेब' या ग्रंथात त्यांची एकसष्ट कवने समाविष्ट असून 'भक्त नामदेवजी की मुखबानी' या नावाने ती प्रसिद्ध आहेत.

प्रस्तुत अभंगामध्ये संत नामदेवांनी विविध दृष्टान्तांतून परमेश्वर कृपेची याचना केली आहे.

**अग्निमाजि पडे बाळू ।**
**माता धांवें कनवाळू ।।१।।**

**तैसा धांवें माझिया काजा ।**
**अंकिला मी दास तुझा ।।२।।**

**सर्वेंचि झेंपावें पक्षिणी ।**
**पिलीं पडतांचि धरणीं ।।३।।**

**भुकेलें वत्सरावें ।**
**धेनु हुंबरत धांवे ।।४।।**

**वणवा लागलासे वनीं ।**
**पाडस चिंतीत हरणी ।।५।।**

**नामा म्हणे मेघा जैसा ।**
**विनविती चातक तैसा ।।६।।**

सकलसंतगाथा खंड पहिला : श्रीनामदेवमहाराजांची अभंगगाथा
अभंग क्रमांक १६६१
संपादक : प्रा. डॉ. र. रा. गोसावी

**शब्दार्थ :**

**कनवाळू** – दयाळू. **काज** – काम. **अंकिला** – अंकित झालेला. **सवें** – लगेच. **वत्सरावें (वत्सरवें)**– वासराच्या आवाजाने. **पाडस** – हरिणीचे पिल्लू.

## कृती

**(१) पाठाच्या आधारे खालील कृती केव्हा घडतात ते लिहा.**

(अ) माता धावून जाते.....

(आ) धरणीवर पक्षिणी झेपावते.....

(इ) गाय हंबरत धावते.....

(ई) हरिणी चिंतित होते.....

**(२) आकृती पूर्ण करा.**

कवितेतील माता आणि हरिणीचे वर्णन करणारे शब्द

↓ माता [ ]

↓ हरिणी [ ]

**(३) कोण ते लिहा.**

(अ) परमेश्वराचे दास– [ ]

(आ) मेघाला विनवणी करणारा– [ ]

**(४) काव्यसौंदर्य.**

(अ) खालील ओळींचे रसग्रहण करा.

‘सवेंचि झेंपावें पक्षिणी । पिलीं पडतांचि धरणीं ।।
भुकेलें वत्सरावें । धेनु हुंबरत धांवे ।।’

(आ) आई, प्राणी, पक्षी यांच्या मातृप्रेमाचे कवितेतून व्यक्त झालेले वर्णन तुमच्या शब्दांत सांगा.

(इ) संत नामदेवांनी परमेश्वराकडे केलेली विनंती सोदाहरण स्पष्ट करा.

(ई) पक्ष्यांचा/प्राण्यांचा आपल्या पिलाशी असलेल्या संबंधाबाबत तुमचा अनुभव लिहा.

❖ ❖ ❖

9KESVL

# २. संतवाणी

## (आ) योगी सर्वकाळ सुखदाता

**संत एकनाथ** (१५३३ ते १५९९) :

भागवत संप्रदायातील थोर संतकवी. सोळाव्या शतकातील महाराष्ट्राच्या सांस्कृतिक प्रबोधनाचे प्रवर्तक. 'एकनाथी भागवत', 'रुक्मिणी स्वयंवर', 'भावार्थ रामायण' इत्यादी ग्रंथ, अभंग, आख्याने, गौळणी, पदे, भारुडे अशी त्यांची बहुआयामी लेखनसंपदा आहे. बहुश्रुतता, समन्वयशीलता, सामान्यांच्या उद्धाराची तळमळ, आलंकारिकता, पौराणिक कथासंदर्भ, सुबोधता हे संत एकनाथांच्या काव्याचे प्रमुख विशेष होत.

प्रस्तुत अभंगात योगी पुरुष आणि पाण्याची तुलना केली असून, योगी पुरुष हा पाण्यापेक्षाही श्रेष्ठ आहे, हे विविध दृष्टान्तांतून संत एकनाथ यांनी स्पष्ट केले आहे.

**जेवीं चंद्रकिरण चकोरांसी । पांखोवा जेवीं पिलियांसी ।**
**जीवन जैसे कां जीवांसी । तेवीं सर्वांसी मृदुत्व ।।**
**जळ वरिवरी क्षाळी मळ । योगिया सबाह्य करी निर्मळ ।**
**उदक सुखी करी एक वेळ । योगी सर्वकाळ सुखदाता ।।**
**उदकाचें सुख तें किती । सवेंचि क्षणें तृषितें होती ।**
**योगिया दे स्वानंदतृप्ती । सुखासी विकृती पैं नाही ।।**
**उदकाची जे मधुरता । ते रसनेसीचि तत्त्वतां ।**
**योगियांचे गोडपण पाहतां । होय निवविता सर्वेंद्रियां ।।**
**मेघमुखें अध:पतन । उदकाचें देखोनि जाण ।**
**अध:पातें निवती जन । अन्नदान सकळांसी ।।**
**तैसे योगियासी खालुतें येणें । जे इहलोकीं जन्म पावणें ।**
**जन निववी श्रवणकीर्तनें । निजज्ञानें उद्धरी ।।**

'एकनाथी भागवत' शासकीय प्रत : अ. ७.
ओव्या ४६५ ते ४६८, ४७३ ते ४७४

**शब्दार्थ :**

**जेवीं** – ज्याप्रमाणे. **चकोर** – एक पक्षी. हा चंद्रकिरणे पिऊन जगतो अशी कल्पना आहे. **पांखोवा** – पक्षिणीचे पंख. **जीवन** – पाणी. **क्षाळणे** – धुणे. **सबाह्य** – आतून व बाहेरून. **उदक** – पाणी. **तृषित** – तहानलेला. **निववणे** – संतुष्ट करणे, शांत करणे. **निजज्ञान** – आत्मज्ञान.

## कृती

**(१) खालील चौकटी पूर्ण करा.**


(अ) अभंगात वर्णिलेला चंद्रकिरण पिऊन जगणारा पक्षी ☐

(आ) पिलांना सुरक्षितता देणारे ☐

(इ) स्वत:ला मिळणारा आनंद ☐

(ई) व्यक्तीला सदैव सुख देणारा ☐

**(२) खालील आकृती पूर्ण करा.**




**(३) खालील तक्ता पूर्ण करा.**

**योगीपुरुष आणि जीवन (पाणी) यांच्यातील फरक स्पष्ट करा.**

| योगीपुरुष | जीवन (पाणी) |
|---|---|
| | |

**(४) खालील शब्दांसाठी कवितेतील समानार्थी शब्द शोधा.**

(अ) जीभ– (आ) पाणी– (इ) गोडपणा– (ई) ढग–

**(५) काव्यसौंदर्य.**

(अ) खालील ओळींचे रसग्रहण करा.

तैसे योगियासी खालुतें येणें । जे इहलोकीं जन्म पावणें ।
जन निववी श्रवणकीर्तनें । निजज्ञानें उद्‌धरी ।।

(आ) ‘योगी पुरुष पाण्यापेक्षा श्रेष्ठ आहे’ हे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(इ) योगी पुरुष आणि पाणी हे दोघेही सामाजिक कार्य करतात, हे स्पष्ट करा.

9HT2C6


❖ ❖ ❖

# भाषाभ्यास


## रसविचार


मानवी जीवनात कलेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कोणतीही कलाकृती पाहताना, तिचा आस्वाद घेताना मानवी मनात भावनांचे अनेक तरंग उठतात. कलेचा आस्वाद घेण्याचे कौशल्य प्रत्येकाच्या स्वानुभव क्षमतेवर अवलंबून असते. ही अनुभवक्षमता शालेय वयापासून वृद्धिंगत व्हावी, या दृष्टीने ‘रसास्वाद’ ही संकल्पना आपण समजून घेऊया. मानवाच्या अंत:करणात ज्या भावना स्थिर व शाश्वत स्वरूपाच्या असतात, त्यांना ‘स्थायिभाव’ असे म्हणतात. उदा., राग, दु:ख, आनंद इत्यादी.

कोणत्याही कलेचा आस्वाद घेताना या भावना जागृत होतात व त्यांतून रसनिष्पत्ती होते.




स्थायिभावांची उत्कट स्थिती म्हणजे रस होय.




साहित्यामध्ये गद्य-पद्य घटकांचा आस्वाद घेताना आपण अनेक रस अनुभवतो. गद्य-पद्य घटकांतून चपखलपणे व्यक्त होणारा आशय, दोन ओळींमधील गर्भितार्थ, रूपकात्मक भाषा, पद्य घटकांतील अलंकार, सूचकता, प्रसाद, माधुर्य हे काव्यगुण पदोपदी प्रत्ययास येतात. अर्थपूर्ण रचनांचा रसास्वाद घेण्याची कला आत्मसात झाली, की त्यामुळे मिळणारा आनंद अवर्णनीय असतो. भाषासमृद्धीसाठी ‘रसास्वाद’ या घटकाकडे आवर्जून लक्ष देऊया.

मनातील वैयक्तिक दु:खाची भावना जर साहित्यातून अनुभवाला आली तर तिथे करुण रसाची निर्मिती होते. मनातल्या दु:खाचा निचरा, विरेचन होऊन (कॅथर्सिसच्या सिद्धांतानुसार) कारुण्याच्या सहसंवेदनेचा अनुभव घेता येतो आणि या प्रक्रियेतून काव्याचा आस्वाद घेता येतो. तसेच वैयक्तिक दु:खाची भावना सार्वत्रिक होऊन तिचे उदात्तीकरण होते. अशा भावनांच्या उदात्तीकरणामुळे मी व माझा या पलीकडे जाऊन व्यक्तींच्या व समाजाच्या भावनांचा आदर करण्याची वृत्ती जोपासली गेली तर नात्यांमधील, व्यक्तीव्यक्तींमधील भावसंबंधाचे दृढीकरण होते.

कोणतीही कलाकृती अभ्यासताना त्या कलाकृतीचा आस्वाद घेता आला तरच ती आनंददायी ठरते. एखादी कलाकृती दिसणे, ती पाहणे व ती अनुभवणे, हे कलाकृतीच्या आस्वादाचे टप्पे आहेत. केवळ डोळ्यांनी नव्हे तर मनाने कलाकृती अनुभवता आली पाहिजे. कोणत्याही कवितेचे, पाठाचे आकलन होऊन संवेदनशीलतेने कलाकृतीतील अर्थ, भाव, विचार, सौंदर्य टिपता आले पाहिजे. कवीला काय सांगायचे आहे याविषयी दोन ओळींमधील दडलेला मथितार्थ समजला तरच कवितेचे पूर्णांशाने आकलन होते व त्याच्या रसनिष्पत्तीचा आनंद घेता येतो. आपल्या पाठ्यपुस्तकातील प्रत्येक पाठ, प्रत्येक कविता, प्रत्येक घटक यांकडे पाहण्याची अर्थ समजून घेण्याची ही आस्वादक दृष्टी विकसित झाली, तर भाषेचा खरा आनंद प्राप्त होईल.